**MHWR06-000163-2022**

| | |
|---|---|
| दाखल ता. | – २४/०१/२०२२ |
| नोंदणी ता. | – २४/०१/२०२२ |
| निकाल ता. | – ०६/०६/२०२६ |
| कालावधी | – वर्ष ०४ महिने ०४ दिवस १३ |

सं.फौ.ख.क्र. १०५/२०२२ निशाणी क्र......२०.......

नमुना क्र. ३२
भाग 'अ'
न्यायनिर्णयाचे शिर्षक पान
[फौजदारी प्रक्रिया संहितेचे प्रकरण ६ मधील परिच्छेद ४४(१)]

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र.१), हिंगणघाट**
**यांच्या न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारीः– श्रीमती निलम जे. पेठे)**

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०६/०६/२०२६ |
| संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्रमांक | १०५/२०२२ |
| प्रथम खबर अहवाल/अपराध क्र. | ११०१/२०२१ |
| पोलीस स्टेशन – | हिंगणघाट, जि. वर्धा |
| अभियोग पक्ष – | महाराष्ट्र शासन<br>मार्फत पोलीस स्टेशन हिंगणघाट, जि. वर्धा |
| प्रतिनिधित्व कर्ता – | विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. चौधरी |
| आरोपी – | प्रशिल वासुदेवराव हिवंज<br>वय – ३५ वर्षे, धंदा – शेती<br>रा. गोविंदपूर, ता. हिंगणघाट, जि. वर्धा |
| प्रतिनिधीत्व कर्ता – | विद्वान वकील श्री. ठाकरे |

## भाग 'ब'

## [फौजदारी प्रक्रिया संहितेचे प्रकरण ६ मधील परिच्छेद ४४(२)]

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २२/११/२०२१ |
| गुन्हा नोंद केल्याची तारीख | २३/११/२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल झाल्याची तारीख | १०/०१/२०२२ |
| विवरण ठेवल्याची तारीख | १३/०७/२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०८/०३/२०२३ |
| न्यायनिर्णयासाठी ठेवल्याची तारीख | ०६/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०६/०६/२०२६ |
| शिक्षा सुनावली असल्यास, त्याची तारीख | – |

## आरोपीचा तपशील

| अ.क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर मुक्त केल्याची तारीख | दोषारोपाचे कलम | निर्दोष की दोषी | सुनावण्यात आलेली शिक्षा | वजावट कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रशिल वासुदेवराव हिवंज | २३.११.२०२१ | २४.११.२०२१ | २९४, ५०४, ५०६ व ५०९ भां.द.वि. | निर्दोष | - | - |

## अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| अभियोग पक्षाचा सा.क्र. १. | सौ. इंदुबाई मानीक देशमुख | फिर्यादी |
| अभियोग पक्षाचा सा.क्र. २. | विनोद तात्या सांबरे | घटनास्थळ पंच |
| अभियोग पक्षाचा सा.क्र. ३ | शुभांगी रविंद्र हिवंज | साक्षदार |
| अभियोग पक्षाचा सा.क्र. ४ | लताबाई सुनील धोबे | साक्षदार |
| अभियोग पक्षाचा सा.क्र. ५ | रविंद्र कृष्णाजी हिवंज | साक्षदार |

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्षाचा सा.क्र. ६ | संदीप विक्रमचंद मेंढे | तपासी अधिकारी |

आरोपीने पुरावा दिलेला नाही. न्यायालयाचा साक्षीदार नाही.

**अभियोगपक्षातर्फे निशाणी क्रमांक देण्यात आलेल्या कागदपत्रांची यादी**

| **अ.क्र** | **निशाणी क्रमांक** | **वर्णण** |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र.०७ | तोंडी रिपोर्ट |
| २. | निशाणी क्र. ०८ | छापील प्रथम खबर |
| ३. | निशाणी क्र. ११ | सुचनापत्र वरील पंचांची सही |
| ४. | निशाणी क्र. १२ | घटनास्थळ पंचनामा वरील पंचांची सही |

**महत्वाचा वस्तुजन्य पुरावा**

| **अ.क्र** | **महत्वाचा वस्तुजन्य पुरावा क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| - | – | – |

**<u>न्या य नि र्ण य</u>**

(पारीत दिनांक ०६/०६/२०२६)

आरोपीवर भारतीय दंड विधान कलम २९४, ५०४, ५०६ व ५०९ अन्वये दोषारोप ठेवण्यात आले आहे.

२) **<u>अभियोग पक्षाच्या खटल्याचा सारांश पुढील प्रमाणे</u> –**

फिर्याद देणार, सौ. इंदूबाई माणिकराव देशमुख यांनी फिर्यादमध्ये कथन केले की, दि.२२.११.२०२१ रोजी रात्री आठ वाजताच्या दरम्यान त्या व त्यांचे पती घरी हजर असताना आरोपी प्रशील दारू पिवून घराचे बाहेर गल्लीतील रोडवर आला व फिर्यादीला व शुभांगी हिवंज यांना "तुम्ही माझी पोलीस स्टेशनला रिपोर्ट का दिली" या

कारणावरून वाद केला. तसेच "माझे पोलीसांनी काय केले तुम्ही रिपोर्ट दिली तर, तुम्ही जास्त माजल्या आहे, तुम्हा दोघीला मी पोंगा उभा करून नंग्या करून हेपतो, मागून साडया उची करून हेपतो" अशा अश्लील भाषेत शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली तेव्हा तेथे लता धोबे, बेबी हिवंज, बेबी चावके, विनोद सांबरे, रविंद्र हिवंज हे हजर होते. फिर्यादी घराच्या बाहेर आल्या तर आरोपी घरात जावून लपून गेला व घरातून पण शिवीगाळ करत होता. म्हणून फिर्यादीने आरोपीविरुध्द हिंगणघाट पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.११०१/२०२१ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

३) माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द निशाणी क्र.०४ अन्वये दोषारोप ठेवले. आरोपीने गुन्हा मान्य केला नाही व प्रकरण चालविण्याची विनंती केली.

४) प्रस्तुत खटल्याच्या न्यायनिर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित झाले. त्यावरील माझे निष्कर्ष सविस्तर कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नमूद केले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.२२/११/२०२१ रोजी २०.३० ते २०.५० वाजताच्या सुमारास मौजा गोविंदपुर, ता. हिंगणघाट येथे आरोपीने सार्वजनिक ठिकाणी इतरांना त्रास होईल अशाप्रकारे फिर्यादी सौ. इंदूबाई माणीकराव देशमुख यांना ''तुम्ही जास्त माजल्या आहे, तुम्हा दोघीला मी पोंगा उभा करून नंग्या करून हेपतो, मागून साडया उची करून हेपतो" अशी अश्लील शिवीगाळ केली, आणि त्याव्दारे त्याने भारतीय दंड विधानाचे कलम २९४ अन्वये शिक्षेसपात्र गुन्हा केला, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नकारार्थी. |

२. वर दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला धाकधपटशा करुन शिवीगाळ केली व तिचेकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल या उद्देशाने तिला प्रक्षोभीत केले आणि त्याव्दारे त्याने भारतीय दंड विधानाचे कलम ५०४ अन्वये गुन्हा केला हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ?

नकारार्थी.

३. वरील तारीख, वेळी व ठिकाणी, आरोपीने फिर्यादीला तिच्या मनात भिती उत्पन्न करण्याच्या उद्देशाने जिवे मारण्याची धमकी दिली व फौजदारी पात्र धाकदपटशा दाखविला, आणि त्याव्दारे त्याने भारतीय दंड विधानाचे कलम ५०६ अन्वये शिक्षेसपात्र गुन्हा केला, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ?

नकारार्थी.

४. अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, वरील नमुद ठिकाणी, वेळी व तारखेला आरोपीने फिर्यादीचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने शब्दोच्चार उच्चारले ज्यामुळे फिर्यादीच्या एकांतपणाचा भंग केला व त्याव्दारे त्याने भारतीय दंड विधानाचे कलम ५०९ अन्वये शिक्षेसपात्र गुन्हा केला, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ?

नकारार्थी.

५. काय आदेश ? आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते.

**: का र ण मि मां सा :**

५) प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने एकूण सहा साक्षीदार म्हणजेच फिर्यादी सा.क्र.१ सौ. इंदूबाई मानीक देशमुख (नि.क्र.६), सा.क्र.२ विनोद तात्या सांबरे (नि.क्र.१०), सा. क्र. ३ शुभांगी रविंद्र हिवंज

(नि.क्र. १३), सा.क्र.४ लताबाई सुनील धोबे (नि.क्र.१४), सा.क्र.५ रविंद्र कृष्णाजी हिवंज (नि.क्र.१६) व सा.क्र.६ संदीप विक्रमचंद मेंढे (नि.क्र.१७) यांना तपासले. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आले. त्यामधे आरोपीने त्याचे विरुध्द खोटे प्रकरण दाखल केले असल्याचा बचाव घेतला.

**मुद्दे क्रं. १ ते ४ करिता :**

६) प्रस्तुत प्रकरणात तपासण्यात आलेले सा.क्र.१ फिर्यादी सौ. इंदूबाई मानीक देशमुख यांनी त्यांच्या साक्षपुराव्यात असे कथन केले की, त्या आरोपीला ओळखतात. तो त्यांच्या घराशेजारी राहतो. घटना दि.२२/११/२०२१ रोजी रात्री ०८.०० ते ०८.३० वाजता घडली. त्यावेळी त्या घरीच होत्या. आरोपी त्यांच्या घराच्या समोर आला. तो दारु पिवून होता. तो सार्वजनिक रोडवर उभा होता. तो शिव्या देत होता. रस्त्यावरून जाणे येणेच्या कारणावरून आरोपी शिवीगाळ करत होता. "मी पोंगा उभा करून मागून साडी वरती करून हेपतो" असे म्हटल्यामुळे त्यांना लज्जास्पद वाईट वाटले. असे दोन ते तीनदा म्हणून त्यांना व शुभांगीला शिव्या दिल्या होत्या. रविंद्र हिवंज, विनोद सांबरे व शुभांगी हिवंज तेथे होते. त्यानंतर तो त्याच्या घरी गेला. त्यानंतर त्यांनी दुस–या दिवशी फिर्याद दिली. पोलीस स्टेशनला पोहोचले तेव्हा अंदाजे सकाळचे १०.०० वाजले होते. रात्र झाली असल्याने कोणतेही गाडीचे साधन नसल्यामुळे दुस–या दिवशी फिर्याद दिली. पोलीस चौकशीकरीता अंदाजे दुपारचे ०४.०० वाजता आले होते. त्यांनी घटनास्थळ पोलीसांना दाखविले होते.

७) बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासामधे त्यांनी असे मान्य केले की, त्यांच्या गावावरून हिंगणघाट पोलीस स्टेशन तीन कोस अंतरावर आहे. त्यांचे

गावातील लोक ओळखीचे आहे. आरोपी व त्यांच्या घरामध्ये गल्ली आहे. तथाकथीत घटना गल्लीत घडली. गल्लीत एक सांडपाण्याची नाली आहे. आरोपीने म्हटले होते की, नाली साफ करत जा. घटनेच्या एक महीन्यापूर्वी सांडपाण्याच्या कारणावरून वाद झाला होता. बोथुळा गावी त्यांचे जावई राहतात. त्यांच्याकडे मोटरसायकल आहे. गावातील ओळखीच्या लाकांकडे मोटरसायकल आहे. दि.२२ किंवा २३ रोजी पोलीसांनी त्यांचे बयाण नोंदविले. पहिली तक्रार त्यांनी दि.२२ रोजी दिली होती महीना त्यांना आठवत नाही. त्यानंतर दुसरी तक्रार म्हणजे सध्याची तक्रार एका महीन्यानंतर दिली होती. पहिल्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध कार्यवाही झाली नाही म्हणून दुसरी तक्रार दिली. तक्रार देण्यापूर्वी त्या विनोद सामरे व अलोणी यांना भेटले. विनोद सामरे व अलोणी यांच्याविरुद्ध पक्षाची आरोपीची आई आहे. गल्लीतील अर्धी जागा त्यांची व अर्धी जागा आरोपीची आहे. रस्त्याच्या कारणावरून त्यांचा आरोपीसोबत वाद होता. विनोद सांबरे, शुभांगी हिवंज, लताताई धोबे यांच्यासोबत त्यांचे चांगले संबंध आहे. त्या पोलीस स्टेशनला अलोणी पाटील यांचेसोबत गेल्या होत्या. आरोपी व अलोणी पाटील यांचे पटत नाही. ज्यादिवशी त्यांनी बयाण दिले त्यादिवशी अलोणी पाटील त्यांचेसोबत नव्हते. घटनेच्या दुस–या दिवशी पोलीस स्टेशनमध्ये त्यांच बयाण नोंदविल होते. पुढे सदर साक्षदार कबूल करते की, ज्यादिवशी त्यांचे बयाण नोंदविले होते त्यादिवशी अलोणी पाटील त्यांचेसोबत होते. बयाण पोलीसांनी संगणकावर स्वतः तयार केले होते.

८) सा.क्र.२ विनोद तात्या सांबरे यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, ते फिर्यादीला व आरोपीला ओळखतात. ते त्यांच्या गावतील रहिवासी आहेत.

दि.२३.११.२०२१ रोजी पोलीसांनी त्यांना घटनास्थळ पंचनामा करण्याकरीता बोलावले होते. हजर राहण्याबाबत पोलीसांनी त्यांना सुचनापत्र दिले होते. पोलीसांनी त्यांना फिर्यादी व आरोपीच्या घराच्या मध्ये असणा–या सरकारी रोडवर बोलावले होते. त्यावेळी फिर्यादी इंदुबाई यांनी घटनास्थळ दाखविले होते. त्यानंतर फिर्यादीने दाखवल्याप्रमाणे त्यांच्या समक्ष घटनास्थळ पंचनामा करण्यात आला. सदर पंचनामा कार्यवाही करतेवेळी त्यांच्या समक्ष दुसरा पंच विलास हजर होता.

९) बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासामधे सदर साक्षदाराने असे मान्य केले की, पोलीसांनी त्यांना सुचनापत्र दि.२३.११.२०२३ रोजी दिले होते. सुचनापत्रांमध्ये त्यांना पंचनामाकरीता फिर्यादी व आरोपीच्या घरामध्ये असणा–या रोडवर हजर राहण्याचे सांगीतले होते. सदरची बाब सुचनापत्रामध्ये नमूद होती. त्यांना सुचनापत्र सकाळी आठ वाजता प्राप्त झाले होते. सुचना पत्रानुसार कार्यवाही करीता ते दुपारी साडेतीन वाजता हजर झाले होते व कार्यवाही साडेचारला सुरू झाली होती. पंचनामामध्ये काय लिहिले होते हे त्यांनी वाचले होते. घटनास्थळाच्या दक्षीणेला प्रशांत यांचे घर आहे, उत्तरेला इंदुबाई हिचे घर, पूर्वेला आलोने पाटलाचा खाली प्लॉट आहे व पश्चिमेला आलोने पाटलाचे शेत आहे. त्यांनी ज्या चतुर्सिमा सांगीतल्या त्या पंचनामामध्ये नमूद केलेल्या आहेत. पंचनामा कार्यवाही अर्धा तास चालली होती. आरोपीची आई उपसरपंच आहे.

१०) सा.क्र.३ शुभांगी रविंद्र हिवंज यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, त्या फिर्यादीला व आरोपीला ओळखतात. ते त्यांच्या घराशेजारी राहतात. दि.२३.११.२०२१ रोजी रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास आरोपी दारू पिवून फिर्यादीस

घाणेरडया भाषेत शिवीगाळ करत होता, त्यावेळी आरोपीने त्यांना देखील घाणेरड्या भाषेत शिवीगाळ केली. त्यावेळी आरोपीने त्यांना व फिर्यादीला "तुला खपखप हेपून काढील, पोंगा उठ गया चडडी छुट गया" अशा भाषेत शिवीगाळ केली. त्यावेळी त्या ठिकाणी त्यांचे पती व इतर महिला उपस्थित होत्या. त्यावेळी कोणीही आरोपीला समजून सांगण्याचा प्रयत्न केला नाही. त्यानंतर त्या पोलीस स्टेशनला गेल्या व इंदूबाई यांनी आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिली. त्यानंतर पोलीस त्यांच्या गावात आले होते व त्यांच्याकडे विचारणा केली होती. पोलीसांनी त्यांचे बयाण नोंदविले होते. बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासामधे सदर साक्षदाराने असे मान्य केले की, आरोपीच्या आई उपसरपंच आहे. त्या न्यायालयात आल्यानंतर त्यांना त्यांच्या गावातील आलोने पाटील नामक इसम भेटला होता. सद्यस्थितीत आरोपीचे व आलोने पाटील यांचे पटत नाही. आरोपीचे व त्यांचे देखील पटत नाही. आरोपीच्या व फिर्यादी इंदूबाई यांच्या घराच्या मध्ये जी गल्ली आहे ती खाजगी गल्ली आहे. पोलीसांनी त्यांचे बयान २० तारखेला नोंदवले होते. रिपोर्ट देतेवेळी त्या इंदूबाई यांचेसोबत पोलीस स्टेशन येथे गेल्या होत्या. त्यावेळी त्यांचे पती देखील त्यांचेसोबत होते तसेच त्यावेळी विनोदराव सांबरे हे देखील त्यांचेसोबत उपस्थित होते. पुराव्याच्या दिवशी न्यायालयात आल्यानंतर त्यांना व विनोदराव सांबरे यांना आलोने पाटील भेटले होते. त्यांच्या व फिर्यादीच्या घरामध्ये एक घर आहे. त्या राहतात त्या परीसरात लताबाई धोबे, विठठलराव हिवंज, इंदूबाई देशमुख व आरोपीचे देखील घर आहे. त्यांच्या परीसरात विनोद सांबरे यांचे घर नाही. घटनेच्या वेळी त्याठिकाणी जे लोक उपस्थित होते त्या इतर लोकांची नावे त्यांना सांगता येणार नाहीत.

११) सा.क्र.४ लताबाई सुनील धोबे यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले की, त्या फिर्यादीला व आरोपीला ओळखतात. ते त्यांच्या शेजारी राहतात. दि.२२.११.२०२१ रोजी रात्री ०८.३० वाजेच्या सुमारास त्या त्यांच्या घरी असताना आरोपी दारु पिवून फिर्यादीस घाणेरडया भाषेत शिवीगाळ करत होता. त्यावेळी आरोपी फिर्यादीच्या घरासमोरून फिर्यादीला शिवीगाळ करीत होता. आरोपीने जे शब्द वापरले होते ते अत्यंत गलिच्छ होते. त्यावेळी आरोपी दारू पिवून होता. त्यानंतर आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये भांडण झाले. त्यानंतर फिर्यादी इंदूबाई हिने आरोपीविरुद्ध फिर्याद दाखल केली. बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासामधे सदर साक्षदाराने असे मान्य केले की, पोलीसांनी त्यांचे बयाण नोंदविले नव्हते. त्यांचे घर फिर्यादी व आरोपीच्या घराजवळच आहे. फिर्यादी व आरोपी मध्ये घटनेच्या पूर्वी गल्ली वरून वाद होता. ज्या गल्लीवरून वाद होता ती गल्ली खाजगी गल्ली आहे. घटना घडली त्यावेळी त्या त्यांच्या घरी होत्या. घटनेच्या दिवशी ते रात्री अकरा वाजेपर्यंत जागे होते. घटनेच्या दिवशी त्या ठिकाणी आजूबाजूला राहणारे बरेच लोक जमले होते. जमा झाले लोक त्यांच्या ओळखीचे नव्हते. त्यांचे गाव खूप लहान आहे. त्या त्यांच्या गावातील सर्वच लोकांना ओळखतात. घटनेच्या वेळी जमा झालेले लोक हे त्यांच्या गावातीलच लोक होते.

१२) सा.क्र.५ रविंद्र कृष्णाजी हिवंज यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले की, ते फिर्यादीला व आरोपीला ओळखतात. घटना दि.२२.११.२०२१ रोजी रात्री ०८.३० वाजताच्या दरम्यान आरोपी व फिर्यादीच्या घराजवळील गल्लीत रोडवर घडली होती. त्यावेळेस ते घरी होते. त्यांना आरोपीचा आवाज आला म्हणून ते बाहेर निघाले. त्यावेळेस

आरोपी इंदूबाई व शुभांगीला घाणेरडया भाषेत शिवीगाळ करीत होता. आरोपी पोंगा काढून साडी सोडून नंगी करून हेपतो अशी शिवीगाळ करत होता. त्यावेळेस आरोपी दारू पिवून होता. सदर घटना त्यांचेसमोर घडली होती. पोलीसांनी त्यांचे बयाण नोंदविले होते. बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासामधे सदर साक्षदाराने असे मान्य केले की, घटना घडली तेव्हापासून आरोपीसोबत त्यांची बोलचाल नाही. ते न्यायालयात दुस–यांदा साक्ष देण्यासाठी आले. तथाकथीत घटनेच्या आधी त्यांच्या गावामध्ये ग्रामपंचायतीच्या निवडणुका झाल्या होत्या त्या निवडणुकमध्ये आरोपीची आई उभी होती. त्यांच्याविरुद्ध हिवंजबाई उभी होती. इंदुबाई गावनात्याने त्यांची मावशी लागते. ते निवडणूकीत इंदूबाईच्या बाजुने होते. त्यांना रोड व गल्ली मधला फरक कळतो. आरोपी व फिर्यादीचे गल्लीवरून जुना वाद होता. त्यांच्या नुसार रोड व गल्ली एकच आहे. घटनास्थळाचे उत्तरेला इंदुबाईचे घर, दक्षिणेला बेबी हिवंजचे घर, पूर्वेला गल्ली आहे व नंतर अरुणा पाटील यांचा वाडा आहे. घटनास्थळाच्या पूर्वेला व दक्षिणेला गल्ली आहे. घटनास्थळाच्या पश्चीमेला आरोपीचे घर आहे. पोलीसांनी त्यांचे बयाण २४ तारखेला नोंदविले. त्याचे आधी किंवा नंतर त्यांचे बयान पोलीसांनी नोंदविले नाही.

१३) सा.क्र.६ संदीप विक्रमचंद मेंढे यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले की, ते दि.२२.११.२०२१ रोजी पोलीस स्टेशन हिंगणघाट येथे पोलीस कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत होते. त्यादिवशी त्यांना अपराध क्र.११०१/२०२१ कलम २९४, ५०६ भादवी ची केस डायरी तपासकामी मिळाली. केस डायरीसोबत त्यांना एफआयआर, तोंडी रिपोर्ट मिळाली होती. त्यानंतर ते घटनास्थळावर गेले. घटनास्थळ मौजा गोविंदपूर येथे फिर्यादीचे

घरासमोर होते. त्यानंतर त्यांनी दोन्ही पंचांना सुचनापत्र दिले. फिर्यादीने त्यांना घटनास्थळ दाखविले. त्याचा त्यांनी पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला व त्यानंतर आरोपीला अटक केले. त्यानंतर आरोपीला जामीनवर सोडले. त्यानंतर त्यांनी साक्षदारांचे बयाण नोंदविले. ते आरोपीला ओळखतात. बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासामधे सदर साक्षदाराने असे मान्य केले की, पंचांना दिलेल्या सुचनापत्रामध्ये स्थळ व वेळ नमूद नव्हती. त्यांनी इंदूबाई देशमुख व रविंद्र हिवंजचे बयाण त्यांचे सांगण्यानुसार नोंदविले होते. त्यांनी साडेतीन ते चार वाजताच्या दरम्यान कोणतीही कार्यवाही केली नाही.

१४) सदर प्रकरणातील सर्व साक्षदारांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, फिर्यादी आणि आरोपी यांचा घटनेच्या एक महीन्यापूर्वी सांडपाण्याच्या कारणावरून वाद झाला होता. पहिली तक्रार फिर्यादीने दि.२२ रोजी दिली होती. त्यानंतर दुसरी तक्रार नि.क्र.७ एका महीन्यानंतर दिली होती. पहिल्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध कार्यवाही झाली नाही म्हणून दुसरी तक्रार दिली. फिर्यादीच्या कथनानुसार तक्रार देण्यापूर्वी विनोद सामरे व अलोणी याना ती भेटली होती. विनोद सांबरे व आलोणी यांच्या विरुद्ध पक्षाची आरोपीची आई आहे. तसेच रस्त्याच्या कारणावरून आरोपीसोबत फिर्यादीचा वाद झाला होता. यावरून असे निदर्शनास येते की, आरोपी व फिर्यादीचे रस्त्याच्या कारणावरून आधीपासून वाद आहे. तसेच फिर्याद देण्यापूर्वी फिर्यादी विनोद सांबरे व अलोणी आरोपीच्या आईच्या विरुद्ध पक्षाच्या असलेल्या लोकांशी भेटली होती. सदर प्रकरणातील घटना दि.२२.११.२०२१ रोजी रात्री ०८.३० वाजताच्या दरम्यान फिर्यादीच्या घराजवळ घडली होती. फिर्यादीने तिच्या पुराव्यात हिंगणघाट पोलीस स्टेशन तीन कोस अंतरावर आहे असे

कथन केले आहे. रात्र झाल्यामुळे कोणतेही गाडीचे साधन नसल्यामुळे दुस–या दिवशी फिर्याद दाखल केली असे तिने कथन केले आहे. ती पोलीस स्टेशनला अलोणी पाटील यांच्या सोबत गेली होती. तसेच आरोपी व अलोणी पाटील यांचे पटत नाही. फिर्यादीने तिच्या उलटतपासात कबूल केले आहे की, गावातील ओळखीच्या लोकांकडे मोटरसायकल आहे. या सर्व बाबींवरून असे निदर्शनास येते की, फिर्यादीने घटनेच्या दिवशी फिर्याद दाखल न करता दुस–या दिवशी सकाळी फिर्याद दाखल केली आणि फिर्याद दाखल करण्याच्या आधी ती विनोद सांबरे व अलोणी यांना भेटली आणि त्यांच्यासोबत पोलीस स्टेशनला फिर्याद दाखल करण्यासाठी गेली. फिर्यादीने कथन केले की, आरोपीने फिर्यादी व शुभांगीला "मी पोंगा उभा करून मागून साडी वरती करून हेपतो" अशी शिवीगाळ दोन ते तीन वेळा केली. साक्षदार क्र.३ शुभांगीने तिच्या पुराव्यात कथन केले की, आरोपीने तिला व फिर्यादीला "तुला खपखप हेपून काढील, पोंगा उठ गया चडडी छुट गया" अशा भाषेत शिवीगाळ केली. दोन्ही साक्षदार हे सदर प्रकरणातील प्रत्यक्षदर्शी साक्षदार आहेत. परंतु त्यांनी कथन केलेल्या शिवीगाळीमध्ये महत्वाच्या विसंगती दिसून येत आहेत.

१५) शुभांगी हीने तिच्या उलटतपासात कबूल केले की,न्यायालयात आल्या नंतर तिला तिच्या गावातील ओळखीचा अलोणी पाटील नामक इसम भेटला. सद्यस्थितीत आलोणी पाटील व आरोपीचे पटत नाही. तसेच आरोपीचे व सदर साक्षदाराचे देखील पटत नाही. सदर प्रकरणात आलोणे पाटील हा साक्षदार नाही तरीसुद्धा ते न्यायालयात हजर होते व साक्षदाराला भेटले. यावरून फिर्यादीच्या तसेच सदर साक्षदाराच्या कथनावर प्रश्नचिन्ह निर्माण होते. साक्षदार क्र.४ लताबाई धोबे हिने कथन केले आहे की, घटना घडली त्यावेळी

ती तिच्या घरी होती. घटनेच्या वेळी त्या ठिकाणी आजूबाजूला राहणारे बरेच लोक जमले होते. जमा झालेले लोक तिच्या ओळखीचे नव्हते. त्यांचे गाव खूप लहान आहे व ती गावातील सर्व लोकांना ओळखते. घटनेच्या वेळी जमा झालेले लोक त्यांच्या गावातील लोक होते. मग अशा परिस्थीतीत घटनेच्या वेळी जमा झालेल्या लोकांची नावे सदर साक्षदाराला माहिती असने अपेक्षीत आहे. परंतु तिला जमा असलेल्या लोकांची नावे सांगता आले नाही. त्यामुळे ती घटनेच्या वेळी उपस्थित होती या बाबीवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. साक्षदार क्र.५ रविंद्र हिवंज हा प्रत्यक्षदर्शी साक्षदार आहे व त्यांनी कथन केले की, आरोपीने फिर्यादीला व शुभांगीला "पोंगा काढून साडी सोडून नंगी करून हेपतो" अशी शिवीगाळ करीत होता. फिर्यादी व शुभांगीने कथन केलेल्या शिवीगाळी व सदर साक्षदाराने कथन केलेल्या शिवीगाळीमध्ये विसंगती दिसून येते आहे. तसेच सदर साक्षदाराने फिर्यादी व आरोपी मध्ये गल्लीवरून जुना वाद होता ही बाबसुद्धा मान्य केली आहे.

१६) सदर प्रकरणातीत अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षदारांनी तसेच फिर्यादीने कथन केले आहे की, आरोपी व फिर्यादींमध्ये गल्लीच्या कारणावरून आधीपासून वाद आहे. म्हणजेच त्यांचे नाते वादविवादाचे आहे. अशा परिस्थीतीत अभियोग पक्षाने स्वतंत्र साक्षदार तपासने अपेक्षीत होते. शुभांगी सा.क्र.३ व आरोपीचे पटत नाही. लताबाई धोबे घटनेच्या वेळेस घटनास्थळावर उपस्थित होती ही बाब निःसंशयपणे अभिलेखावर आली नाही. रविंद्र हिवंज साक्षदार क्र.५ यांनी कथन केले की, घटना घडली तेव्हापासून आरोपीसोबत त्यांची बोलचाल नाही. यावरून असे निदर्शनास येते की, सदर साक्षदाराचे हीत सदर प्रकरणात आहे. अभियोग पक्षाने कोणतेही स्वतंत्र साक्षदार तपासले नाही. फिर्यादीने दोन

तक्रारी दिल्या होत्या. पहिल्या तक्रारीवरून कार्यवाही झाली नाही म्हणून दुसरी तक्रार दाखल केली असे कथन केले. तसेच घटना दि.२२.११.२०२१ रोजी घडली व फिर्याद दि.२३.११.२०२१ रोजी दाखल करण्यात आली. फिर्याद दाखल करण्यात १४ तासांचा विलंब झाला आहे. तसेच फिर्यादी फिर्याद देण्याच्या पूर्वी विनोद सांबरे व आलोणे पाटील यांना भेटली व आलोणे पाटील यांना घेवून फिर्याद देण्यासाठी गेली. आलोणे पाटील व आरोपीचे पटत नाही असे साक्षदारांच्या पुराव्यामध्ये आले आहे. या फिर्यादीच्या वागणुकीवरून तीने दिलेली फिर्याद व कथन केलेली घटना घडली या बाबींवर संशय निर्माण होतो. तपासलेल्या सर्व साक्षदारांपैकी साक्षदार क्र.१ व ३ चे आरोपीसोबत पटत नाही असे दिसून येत आहे. तसेच साक्षदार क्र.३ न्यायालयात आल्यानंतर अलोणे पाटील जो सदर प्रकरणात साक्षीदार नाही आणि त्याचेसुद्धा आरोपीसोबत पटत नाही अशा व्यक्तीला भेटली. यावरून आरोपींनी फिर्यादीला व शुभांगीला अश्लील शिवीगाळ केली ही बाब निःसंशयपणे अभिलेखावर आली नाही. फिर्यादीने पुराव्यात कथन केले की, शिवीगाळ ऐकून तिला लज्जास्पद वाटले परंतु साक्षदार क्र.६ ने कथन केले की, फिर्यादीने बयाण देताना लज्जास्पद वाटले असे सागीतले नव्हते. त्यावरून फिर्यादी तिचे बयाण अतिशयोक्ती करून सांगत आहे असे निदर्शनास येते. फिर्यादीचे आरोपीसोबत असलेल्या वादासंबंधी व इतर साक्षदारांचे बयाणावरून घटनेच्या दिवशी आरोपीने फिर्यादी व शुभांगीला अश्लील शिवीगाळ केली ही बाब स्पष्टपणे अभिलेखावर आली नाही.

१७) एकंदरीत वर नमूद केल्याप्रमाणे व वर नमूद कारणांच्या अनुषंगाने सदर प्रकरणात केवळ फिर्यादी व इतर साक्षदार यांची साक्ष आरोपीस दोषी ठरविण्याकामी पुरेशी

नाही. सदर घटनेच्या वेळेस आरोपीने फक्त शिवीगाळ केली एवढीच बाब कलम २९४ भा.द.वी. ची पूर्तता करण्यासाठी पुरेसे नाही. कलम २९४ भादवि अंतर्गत गुन्हा सिध्द करण्यासाठी आवश्यक असलेले पुरक घटक अभियोग पक्ष अभिलेखावर आणु शकले नाही. तसेच कलम ५०४, ५०६ व ५०९ भा.द.वी. मध्ये नमूद असल्या प्रमाणे फिर्यादी व इतर साक्षदारांकडुन पुरावा आलेला नाही त्यामुळे या कलमांची पूर्तता होत नाही. अभिलेखावर आलेला पुरावा आरोपीचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अपुरा पडतो. यावरुन असे निदर्शनास येते की  अभियोग पक्षाने ज्या कलमाखाली प्रकरण दाखल केले त्या कलमातील पुरक घटक त्यांनी सिध्द केले नाही. एकंदरीत वर नमूद केलेल्या विवेचनांवरुन न्यायालय या निष्कर्षाप्रत पोहचत आहे की, अभियोगपक्ष हा वर नमूद कारणांवरुन आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द करणेकामी अपयशी ठरला आहे.  एकंदरीत आरोपी हा निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे. म्हणून वरील सर्व चर्चेअंती मी मुद्दा क्रमांक १ ते ४ चे उत्तर नकारार्थी देत असून मुद्दा क्र. ५ च्या उत्तरा दाखल खालील आदेश पारित करित आहे.

**<u>मुद्दा क्रं. ५ करिता :</u>**

**१८)** ज्याअर्थी, अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द ठेवलेले दोषारोप सिध्द केले नाहीत. त्याअर्थी, आरोपीला निर्दोष मुक्त करणे आवश्यक आहे. वरील चर्चेच्या अनुषंगाने मुद्दा क्र. ५ चे अनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१) **आरोपी प्रशिल वासुदेवराव हिवंज** याची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (१) अन्वये भारतीय दंड विधान कलम २९४, ५०४, ५०६ व ५०९ अन्वये गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीचे जामीनपत्र रद्द करण्यात येत आहेत.

३) आरोपीला असे निर्देश करण्यात येते की, त्याने कलम ४३७–अ फौजदारी प्रक्रिया संहितेच्या पुर्ततेकामी सहा महिन्याच्या कालावधी करीता रक्कम रू.१५,०००/– चे जामीन बंधपत्र सादर करावे.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.

NEELAM JAIKISHOR PETHE
Digitally signed by NEELAM JAIKISHOR PETHE
Date: 2026.06.06 16:16:26 +0530

हिंगणघाट.
दि.०६/०६/२०२६

**(एन. जे. पेठे)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
(१ले न्यायालय), हिंगणघाट.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी खात्रीपूर्वक असे कथन करते की, पी.डी.एफ. फाईल मधील न्यायनिर्णय हे मुळ न्यायनिर्णय प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – कु. एम.जी.मेहरे,
(ग्रेड–३)